# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६**
इ-मेल: **mercindia@mercindia.org.in** वेब-साईट www.mercindia.org.in

## जाहीर नोटीस

### मविनिआ प्रकरण क्रमांक २०१०/१३

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आरइन्फ्रा)ने त्यांच्या ग्राहकांना विजेचे वितरण करण्यासाठी टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (टीपीसी) ंच्या विद्युत निर्मिती केंद्रांमधून विजेचा पुरवठा व्हावा, यासाठी आरइन्फ्राने महाराष्ट्र शासनाकडे अनेक निवेदने सादर केली होती. परिणामी, या संदर्भातील सर्व प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी शासनाने पाच सदस्यांची समिती (समिती) नियुक्त केली. आरइन्फ्रा आणि टीपीसी या दोन्ही कंपन्यांनी सादर केलेल्या निवेदनांचा विचार करुन सदर समितीने एक अहवाल सादर केला. महाराष्ट्र शासनाने टीपीसी, आरइन्फ्रा, बेस्ट आणि आयोगाला, दिनांक ७ मे, २०१० रोजी पाठविलेल्या ''ज्ञापना''चा एक भाग म्हणून सदर अहवाल त्यात समाविष्ट करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाने त्यांच्या दिनांक ७ मे, २०१० च्या ''ज्ञापना''त असे मत व्यक्त केले आहे की, आयोगाने सदर अहवाल, त्यातील खालील ठळक तत्त्वांसह विचारात घेऊन, जनहिताच्या दृष्टिकोनातून लवकरात लवकर योग्य उपाय-योजना कराव्यात.

(१) मेसर्स टीपीसीवर, मुंबईतील वितरण परवानाधारकांना विनियमित/वाजवी दराने अग्रक्रमाने विजेचा पुरवठा करण्याचे बंधन आहे. मेसर्स रिलायन्स इन्फ्राबरोबर वीज खरेदी करण्याचा करार केलेला नसल्यामुळे मेसर्स टीपीसीने त्यांच्या सद्यस्थितीतील वर्चस्वाचा फायदा घेऊन, विजेचा व्यापार करणे, टीपीसी (वीज वितरण)कडे पुरवठा वळविणे किंवा मेसर्स रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरला ती चढ्या भावाने देणे, ज्यामुळे मेसर्स रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरच्या ग्राहकांवर विपरित परिणाम

होऊ शकेल, अशा बाबी न करण्याचे देखील त्यांच्यावर बंधन आहे.

(२) मेसर्स टीपीसीने बेस्ट बरोबर केलेल्या वीज खरेदी करारानुसार बेस्टला वीज दिल्यानंतर आणि त्यांनी टीपीसी (वितरण) ची गरज भागविल्यानंतर, मेसर्स टीपीसीकडून मेसर्स रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरला होणारा अपेक्षित वीज पुरवठा विचारात घेतल्यानंतर, उर्वरित जरुर असलेली वीज वाजवी दराने मिळविण्यात मेसर्स रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरला आलेल्या अपयशामुळे (ज्यासाठी मविनिआकडून यथोचितपणे विनिर्दिष्ट करण्यात येणा-या दंडाच्या रकमांना अधीन राहून), मेसर्स रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरच्या ग्राहकांना वीज दरातील वाढीस सामोरे जावे लागू नये, याची खात्री करण्याचे मेसर्स रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीवर असलेले बंधन.

(३) मेसर्स रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरचे सबसिडी देणारे ग्राहक, सध्या वर्चस्व असणाऱ्या टीपीसीकडे बदलून गेल्या नंतर, मेसर्स रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरच्या सबसिडी मिळणाऱ्या ग्राहकांवर असाधारण वीज दर वाढीचा बोजा पडणार नाही, अशी खात्री करण्यासाठी एक यंत्रणा स्थापण्याची गरज.

विद्युत अधिनियम २००३ ने आयोगावर ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्याची जबाबदारी सोपविलेली आहे. त्याचवेळी, अधिनियमाच्या कलम ८६ च्या उप-कलम (३) नुसार आयोगाने आपले अधिकार वापरताना आणि कार्ये पार पाडताना, पारदर्शकता राहील, याची खात्री करावयाची आहे.

वरील आवश्यकतांनुसार, खालील मुद्यांवर सूचना व हरकती विचारात घेण्यासाठी, आयोगाने रंगशारदा नाटयमंदिर, वांद्रे रेक्लमेशन, वांद्रे (पश्चिम), मुंबई ४०० ०५० येथे दिनांक **२८ जून, २०१०** रोजी **सकाळी ११.०० वाजता** जाहीर सुनावणी आयोजित केली होतीः-

(१) समितीच्या अहवालासह, दिनांक ७ मे, २०१० च्या ''ज्ञापनात'' निर्देशित केलेल्या ठळक तत्त्वांच्या संबंधात उपाययोजना करण्याबाबत आयोगाची भूमिका;

(२) ज्या कायदेशीर तरतुदींखाली आयोग उपाययोजना करु शकेल अशा तरतुदी, असल्यास;

(३) जनहिताच्या दृष्टिकोनातून उचित ठरतील अशा आयोगाने करावयाच्या उपाययोजना.

सदर सुनावणी दि.२८ जून, २०१० रोजी सायंकाळी २१:४५ वाजेपर्यंत चालली. तोपर्यंत अनेक ग्राहक आपले निवेदन सादर करण्याच्या प्रतीक्षेत होते. तथापि त्यांना संधी मिळू शकली नाही. म्हणून आयोगाने वेळेअभावी ही सुनावणी स्थगित केली. ही स्थगित सुनावणी आता **शनिवार, ३ जुलै, २०१०** रोजी **रंगशारदा नाटयमंदिर**, वांद्रे रेक्लेमेशन, वांद्रे (पश्चिम), मुंबई ४०० ०५० येथे **सकाळी १०:३० वाजता** सुरू होईल. सर्व संबंधितांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी त्यानुसार उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे.

सही/
(प्र.बा.पाटील)
निबंधक

मुंबई,
दिनांक : २९ जून, २०१०